संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# भाजपाला आता घरच्यांकडूनच आहेर

**लोकसभा** निवडणुकीच्या धामधुमीत अनेक पक्षांमध्ये अनेक घडामोडी घडत आहेत. काहींची तिकिटे कापली जात आहेत. काही राजकीय पक्षांमधले लोक पक्षांतरे करीत आहेत. काहींचे अध्यक्ष बदलले जात आहेत. तर अनेक ठिकाणी पक्षाच्या अधिकृत उमेदवाराविरुध्द उघड आणि छुपे बंडही होत आहेत. भारतीय जनता पार्टीने बाहेरचे उमेदवार आपल्या पक्षात आणण्यासाठी जोरदार मोहीम सुरू केलेली आहे. यामध्ये नेहमीप्रमाणे नटनट्यांपासून ते क्रिकेटपटूंपर्यंत आणि काँग्रेस पक्षातील अनेक बड्या नेत्यांना आपल्या गळाशी लावण्याचा या पक्षाचा प्रयत्न सुरू आहे. परंतु एकीकडे बाहेरच्या उमेदवारांची पंगत बसवली जात असतानाच आपल्याच पक्षातील नेत्यांकडून भाजपाला घरचा आहेरही मिळत आहे. विशेषतः राष्ट्रीय पातळीवर लालकृष्ण आडवाणी यांचे तिकीट कापल्यानंतर पक्षाच्या जुन्या निष्ठावंतांमध्ये बरीच खळबळ उडाली. आता आडवाणींपाठोपाठ पक्षाचे काही काळ अध्यक्ष राहिलेले मुरली मनोहर जोशींनाही तुम्ही आता घरी बसा असा संदेश पक्षाच्या सचिवांकडून पोहचता केला गेला. हा निरोप मिळाल्याबरोबर मुरली मनोहर जोशी यांनी मतदारांच्या नावाने पत्रक काढून आपल्याला पक्षाने निवडणुक लढवू नये असे सांगितल्याचे जाहीर केले. यामधून मुरली मनोहर जोशींची अस्वस्थता स्पष्ट होते. त्यापाठोपाठ यशवंत सिन्हा, शत्रुघ्न सिन्हा यांनी भाजपाविरुध्द आता उघड बंड पुकारले आहे. आपल्या विद्वत्तेचा प्रचंड अभिमान असलेल्या सुब्रमण्यम स्वामी यांनी आपल्या नावापुढे चौकीदार हा शब्द लावायला नकार दिला. त्यांच्या या भूमिकेमुळे ते या पक्षाचे चौकीदार नसून फौजदार असल्याचेच चित्र निर्माण केले आहे. गुजरातचे मुख्यमंत्री रुपाणी यांनी पाकिस्तानवर टीका करता करता काँग्रेसच्या विजयाचीही शक्यता बोलून दाखवावी यावरून भारतीय जनता पार्टीमध्ये अंतर्गत स्तरावर बरीच खदखद सुरू असल्याचे दिसते. जवळपास सर्वच राज्यांमध्ये अशी अंतर्गत धुसपूस निर्माण झाल्याचे चित्र आहे. महाराष्ट्रातसुध्दा संरक्षण राज्यमंत्री सुभाष भांबरे यांच्याविरुध्द निवडणूक लढवण्याची घोषणा भाजपाचेच आमदार अनिल गोटे यांनी केली आहे. ईशान्य मुंबईमध्ये पक्षाचा उमेदवार निश्चित करताना भाजपाचीच चांगलीच तारांबळ उडताना दिसते. अशा या सगळ्या घटनांचा एकत्रित विचार केला तर पक्षाच्या एकूण विजयावरही त्याचा परिणाम होऊ शकतो किंवा विजयासाठी बरेच प्रयत्न करावे लागतील. असा संदेशही पोहचता होतो.

### मुरली मनोहर जोशींची टीका

विशेष म्हणजे मुरली मनोहर जोशींना तिकीट नाकारल्याने बऱ्याच प्रतिक्रिया निर्माण होतील असे वाटते आणि उत्तर प्रदेशातल्या प्रचारावरही परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. २०१४ च्या निवडणुकीत मुरली मनोहर जोशींकडे असलेला वाराणसी मतदासंघ त्यांनी मोदींसाठी मोकळा करून दिला होता आणि नंतर कानपूरमधून दोन लाखांच्या मताधिक्क्याने ते विजयी झाले होते. त्यांना मंत्रीपदाची खूप मोठी अपेक्षा होती. परंतु पक्षाने त्यांना बाजूला ठेवले आणि आता तर तुम्ही निवडणूक लढवूच नका. असा संदेशच देऊन टाकला आहे. यासंदर्भात त्यांनी मतदारांच्या माध्यमातून आपली नाराजी पक्ष नेतृत्वापर्यंत पोहचवलेली दिसते. पक्षाच्या वरिष्ठांपैकीच यशवंत सिन्हा आणि शत्रुघ्न सिन्हा या दोघांनी पक्षविरोधी प्रचार सुरू केलेला आहे. ज्यावेळी भाजपासारखा राष्ट्रीय पक्ष आपली ताकद वाढवण्यासाठी इतर घटक पक्षांची मदत घेतो किंवा इतर पक्षातील तगडे नेते आपल्या पक्षात आणण्यासाठी सर्व प्रकारचे डावपेच खेळतो. मात्र त्याचवेळी आपल्याच पक्षातील बड्या नेत्यांचे खच्चीकरणही करीत राहतो असे म्हणावे लागेल. स्वाभाविकपणे या नाराजीचे परिणाम काही ना काही प्रमाणात उमटताना दिसतात. यापूर्वीच झालेल्या वेगवेगळ्या सर्वेक्षणांमध्ये भाजपाची संख्या ही २२० ते २६० पर्यंत राहील. असे आकडे प्रसिध्द झाले आहेत. त्यात पुन्हा जर पक्षाच्या अंतर्गत मतभेदांचा धुरळा उडाला असेल तर सर्वेक्षणाचे हे आकडे तरी गाठले जातील की नाही, अशी शंका निर्माण होते. तेव्हा प्रत्यक्ष विजयापूर्वीच भाजपाला मिळत असलेला हा घरचा आहेर राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा ठरतो. अशा परिस्थितीत गुजरातसारख्या पंतप्रधानांच्याच राज्याचा मुख्यमंत्री जेव्हा चित्रविचित्र विधान करतो. त्यावेळेला ही अंतर्गत चलबिचल बरीच मोठी आहे असे म्हणावे लागते. रुपाणी यांनी असे म्हटले होते की जर चुकून काँग्रेसला विजय मिळाला तर पाकिस्तानमध्ये दिवाळी साजरी होईल. हे त्यांचे विधान पक्षातल्या अनेकांना धक्का देणारे ठरले आहे.

### आत्मविश्वास आणि आत्मग्लानी

आपल्या फटकळ स्वभावामुळे प्रसिध्द असलेल्या सुब्रमण्यम स्वामींनीदेखील पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अर्थमंत्री अरुण जेटली यांच्यावर टीका करण्याची संधी सोडलेली नाही. आपण ब्राह्मण असल्यामुळे आपल्या नावापुढे चौकीदार हा शब्द लावू शकत नाही! असे स्पष्ट शब्दात सांगतानाच मोदी आणि जेटली या दोघांनाही अर्थशास्त्रातले काही कळत नाही. अशी बोचरी टीकाही त्यांनी केली आहे. लोकसभा निवडणुकीच्या प्रचार काळात या ज्येष्ठ नेत्यांकडून अशा प्रकारची विधाने होणे म्हणजे पक्षाची अधिकच कोंडी करण्यासारखे ठरते. या सर्वांची पक्षावरील टीका केवळ नाराजीतून आहे, असे जरी मानले तरी पक्षात नाराजी ठेवून बाहेरच्यांना आपल्या पक्षात आणण्यासाठी राजी करण्याचा उद्देशही अनाकलनीय ठरतो. सारांश रुपाने असे म्हणता येते की, भारतीय जनता पार्टीला एअर स्ट्राईक केल्याने मोठा आत्मविश्वास वाटू लागला होता, परंतु पक्षांतर्गत मतभेदांच्या स्ट्राईकने निकालांवर परिणाम होण्याची शक्यता वाढू लागली आहे. पुढच्या महिनाभरामध्ये परिस्थितीत आणखी काय काय बदल होतो हे कळेलच. परंतु पक्षांतर्गत कारभार खूप आलबेल आहे. असे समजण्याचे कारण नाही. यावेळची निवडणूक कोणत्याही लाटेशिवाय होत असल्याने मतदार काय निर्णय घेतात यावर बरेच अवलंबून राहील. या पार्श्वभूमीवर सत्ताधारी पक्षाचा आत्मविश्वास वाढत असतानाच अंतर्गत बंडाळीमुळे त्याच पक्षाला आत्मग्लानी येण्याचीही शक्यता नाकारता येत नाही.